# लाँग लाईन मासेमारी पद्धती मधील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना

♦

# शार्कच्या संरक्षण तथा व्यवस्थापन हेतु कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना

♦

# मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना

FIAT PANIS

Food and Agriculture Organization of the United Nations

# लाँग लाईन मासेमारी पद्धती मधील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना

◆

# शार्कच्या संरक्षण तथा व्यवस्थापन हेतु कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना

◆

# मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना

**FOOD AND AGRICULTURE ORGANIZATION OF THE UNITED NATIONS**
**Rome, 1999**

पुनः प्रकाशन-2000

या प्रकाशनातील मजकुराचे सादरीकरण आणि निर्देश, कुठल्याही देश, राज्य, शहर किंवा क्षेत्र किंवा तेथील अधिका-यांच्या कायेद-विषयक स्थितीसंबंधी किंवा आपल्या सीमान्त किंवा सीमा निर्धारणाशी संबंधित संयुक्त राष्ट्राच्या खाद्य आणि कृषि संघटनेच्या वतीने कोणत्याही प्रकारचे मत व्यक्त करत नाही.

आई एस बी एन 92-5-104332-9

सर्व अधिकार सुरक्षित आहेत. या माहिती उत्पादनातील सामग्रीचे पुनर्निर्माण किंवा प्रसारण शैक्षाणिक किंवा गैर-वाणिज्यिक हेतुसाठी कॉपीराईट धारकांच्या पूर्वलिखित परवानगी शिवाय अधिकृत आहेत प्रदान, स्तोत्र पूर्णपणे अभिस्वीकृत आहेत. या माहिती उत्पादनातील सामग्रीचे पुनर्निर्माण, विक्रीसीठी किंवा इतर वाणिज्यिक हेतुसाठी कॉपी राईट धारकांच्या पूर्वलिखित परवानगी शिवाय निषिद्ध आहे. अशा परवानगीसाठी प्रमुख, प्रकाशन आणि मल्टि मिडिया सेवा, सूचना प्रभाग, एफ ए ओ, वयाले डेल्ले टेरमे डी केरकेल्ला, 00100 रोम, इटली या copyright@fao.org ला ई-मेल द्वारे पाठविले पाहिजे.

**© FAO 1999**

Translation: Rajashree Bhoopal Sanadi

*Translated and Printed by the Bay of Bengal Programme*
*Inter-Governmental Organisation*

*September 2015*

**Bay of Bengal Programme**
**Inter-Governmental Organisation**
91, Saint Mary’s Road, Abhiramapuram
Chennai - 600 018, Tamil Nadu, India
Tel: +91-44-24936294, 24936188; Fax: +91-44-24936102
Email: info@bobpigo.org; website: www.bobpigo.org

## या दस्तावेजाची तयारी

या दस्तावेजामध्ये तीन आंतरराष्ट्रिय कारवाईच्या योजनेचा मजकूर समाविष्ट आहे.

- लाँग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी आई पी ओ ए
- शार्कच्या संरक्षण किंवा व्यवस्थापन हेतू आई पी ओ ए
- मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेसाठी आई पी ओ ए

आई पी ओ ए विकसित केले गेले कारण कॉफी (COFI) सदस्यांना 1997 मध्ये असे आढळण्यात आले की जबाबदारीपूर्ण मासेमारीच्या आचार संहितेशी संबंधित समस्यांचे पालन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कराराचे काही प्रपत्र असणे आवश्यक आहे. या तीन समस्यांसाठी योग्य असे साधन म्हणजे स्वैच्छिक आंतरराष्ट्रीय कारवाईची योजना, असे आढळण्यात आले. हे तीन मजकूर, 1998 मध्ये, सर्व एफ ए ओ (FAO) सदस्यांसाठी खुल्या असणा-या दोन आंतरसरकारी बैठकीच्या पाठयक्रमामध्ये विकसित केले गेले. आई पी ओ ए, फ्रेबुवारी 1999 च्या सत्रामध्ये एफ ए ओ (FAO) परिषदे द्वारे मान्यता प्राप्त केले गेले.

जपान, नोर्वे, संयुक्त राज्य अमेरिकेच्या सरकारने तसेच युरोपीय आयोगाने आंतर सरकारी बैठकींसीठी तसेच अधिकांश प्रारंभिक उपक्रमांसाठी वित्तसहाय्य पुरविले.

**एफ ए ओ**
लॉंग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना. शार्कच्या संरक्षण किंवा व्यवस्थापन हेतू कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना. मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना,रोम, एफ ए ओ 1999. 40 पी.


**सारांश**

**आई पी ओ ए – समुद्री पक्षी** ऐच्छिक साधन आहे जे सर्व अशा राज्यांना लागू आहे ज्या राज्यांचे मच्छिमार लॉंग लाईन मासेमारीमध्ये कार्यरत आहेत. या मजकूरामध्ये उपक्रमांचे संच दिले आहेत जे राज्यांनी अमलात आणणे अपेक्षित आहे. लॉंग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड यांच्याशी संबंधित समस्या अस्तित्वात आहेत की नाही यांचे मूल्यांकन करणे तसेच लॉंग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी राष्ट्रिय कारवाईच्या योजनेचा (एन पी ओ ए- समुद्री पक्षी). तसेच राष्ट्रीय पूनरावलोकन आणि अहवाल आवश्यकतेच्या कृतीचा अवलंब करणे. या कृती शक्यतो केव्हा अमलात आणल्या पाहिजेत यांसाठी कॅलेंडर वर्ष निर्देशित केले पाहिजे

**आई पी ओ ए- समुद्री पक्षी** योग्य ते उपशमनाच्या उपायांवर संक्षिप्त स्पष्टीकरण करते. ज्या राज्यांनी ठरवले आहे की त्यांच्या राज्यांना आकस्मिक पकडीच्या समस्या आहेत अशा राज्यांनी एन पी ओ ए- समुद्री पक्षांचा विचार केला पाहिजे.

**आई पी ओ ए- शार्क** ऐच्छिक साधन आहे जे अशा सर्व राज्यांना लागू होते ज्या राज्यांचे मच्छिमार शार्क मासेमारीमध्ये कार्यरत आहेत. या मजकूरामध्ये उपक्रमांचे संच दिले आहेत. जे राज्यांनी अमलात आणणे अपेक्षित आहे. शार्कशी संबंधित समस्या अस्तित्वात आहेत की नाहीत याचे मूल्यांकन करुन शार्कच्या संवर्धन व व्यवस्थापनेसाठी राष्ट्रीय कारवाईची योजना तसेच राष्ट्रिय पुनरावलोकन आणि अहवाल आवश्यकतेच्या कृती अमलात आणणे. या कृती शक्यतो केव्हा अमलात आणल्या पाहिजेत यासाठी कैलेंडर वर्ष निर्देशित केले पाहिजे.

**आई पी ओ ए – क्षमता** एक ऐच्छिक साधन आहे. जे अशा सर्व राज्यांना लागू होते ज्या राज्यांचे मच्छिमार मासेमारीमध्ये कार्यरत आहेत या मजकूराचा पहिला भाग आंतरराष्ट्रिय कारवाईच्या योजनेचे स्वरुप आणि व्याप्ती स्पष्ट करतो. तसेच सिद्धांतांना अधोरेखित करुन आई पी ओ ए चे उद्दिष्ट स्पष्ट करते. या मजकूराचे स्मरणपत्र, तत्काल कारवाई स्पष्ट करते आणि अंमलबजावणीला प्रोत्साहन देणारी प्रणाली ओळखणे आणि तत्काल कारवाईमध्ये मासेमारी क्षमतेचे मूल्यांकन आणि देखरेख तसेच राष्ट्रिय योजनेची तयारी व अंमलबजावणी यांचा समावेश होतो. अंमलबजावणीला प्रोत्साहित करण्यासाठी असणा-या प्रणालींच्या मजकूरामध्ये शास्त्रीय आणि तांत्रिक सहकार्य राष्ट्रिय आणि आंतरराष्ट्रीय अहवाल आणि एफ ए ओ ची भूमिका यांचे स्पष्टीकरण देते. या कृती केव्हा अंमलात आल्या पाहिजेत या विषयाचे कॅलेंडर वर्ष निर्देशित केले पाहिजे.

## सामग्री


| | Page |
| --- | --- |
| लॉंग लाईन मासेमारी पद्धती मधील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना | 1 |
| शार्कच्या संरक्षण तथा व्यवस्थापन हेतु कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना | 11 |
| मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना | 19 |

**लाँग लाईन मासेमारी पद्धती मधील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना**

**परिचयः**

1. जगामध्ये समुद्री पक्षी विविध व्यावसायिक लाँग लाईन मासेमारी पद्धती मध्ये आकस्मिकरित्या पकडले जात आहेत आणि अशा प्रकारच्या आकस्मिक पकडीच्या प्रभावामुळे चिंता उत्पन्न होत आहे. समद्री पक्षांच्या आकस्मिक पकडीचा, मासेमारी उत्पादन व लाभ यावरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. ज्या लाँग लाइन मासेमारी पद्धतीमध्ये समुद्री पक्षांची आकस्मिकरित्या पकड होते, अशा पद्धती मध्ये समुद्री पक्षांचा मृत्युदर कमी करणा-या उपायांची याचिका ही सरकार, सरकारी संघटना आणि व्यावसायिक मासेमारी संघटनांद्वारे सादर केली जात आहे.

2. महासागराच्या काही भागांमध्ये, आकस्मिकरित्या समुद्री पक्षांची पकड होणा-या लाँग लाईन मासेमारीमध्ये टूना, सॉर्ड फिश आणि बिल फिश, दक्षिण महासागरामध्ये पटागोनियन टूथ फिश आणि उत्तर महासागरामध्ये (पॅसिफिक आणि अंटलांटिक) हॅलिबट, ब्लॅक कॉड, ग्रीन लँड हॅलिबट, कॉड, हॅडऑक, टस्क आणि लिंग यांचा समावेश होतो. वारंवार पकडल्या जाणा-या समुद्री पक्षांमध्ये दक्षिण महासागरामध्ये अँलबँट्रोसेस आणि पेट्रेल्स, उत्तर अटलांटिक महासागरामध्ये उत्तरी फलमार्स आणि उत्तर पॅसिफिक मासेमारीमध्ये गलस् आणि फलमार्स यांचा समावेश होतो.

3. दक्षिण महासागरामध्ये व्यावसायिक मासेमारीमध्ये समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्याच्या आवश्यकतेवर प्रतिक्रिया देताना अंटार्क्टिक समुद्री आयोगाने, समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी योजन्यात आलेले उपाय, 1992 मध्ये आपल्या 23 सदस्य देशांसाठी अवलंबिले.

4. दक्षिण ब्लू फिन टूनाच्या संरक्षणार्थ नेमण्यात आलेल्या आयोगाच्या समर्थनार्थ ऑस्ट्रेलिया, जपान आणि न्यूझीलंड यांनी अभ्यास केला आणि 1994 पासून दक्षिण ब्लू फिन टूना लाँग लाईन मासेमारीमध्ये समुद्री पक्षांच्या उपशमनाच्या दृष्टिने उपायांचा अवलंब केला आणि 1995 मध्ये सी सी एस बी टी ने लाँग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांच्या आकस्मिक मृत्यदरा सोबतच पर्यावरणाशी संबंधित प्रजातींसाठी शिफारस पत्र अवलंबिले. हे शिफारस माहिती संग्रहण, उपशमनाचे उपाय त्याचप्रमाणे शिक्षण आणि माहिती प्रसारण यावरील धोरणाचे अनुबंध करते. सी. सी. एस. बी. टी च्या सर्व सदस्य देशांनी पक्षांन घाबरवण्यात येणा-या लाईनचा वापर त्यांच्या मासेमारी पद्धती मध्ये अनिवार्य केला .

5. संयुक्त राज्य अमेरिकेने सुद्धा विनिमया द्वारे तलमज्जी, लाँग लाईन मासेमारी जेथे बेअरिंग सागर अलुशियन व्दिप आणि 1997 मध्ये अलास्काच्या खाडीमध्ये आणि 1998 मध्ये हॅलिबँट मासेमारीसाठी विविध व्यावसायिक लाँग लाईन मासेमारी ज्यात समुद्री पक्षांची आकस्मिकरित्या पकड होते तेथे समुद्री पक्षाची आकस्मिक पकड कमी करणा-या उपायांना आत्मसात केले आहे. संयुक्त राज्य अमेरिका हवाईन पेलॅजिक लाँग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी सध्या उपाय विकसित करीत आहे. अनेक लाँगलाईन मासेमारी करणारे देश अशा प्रकारचे उपशमनाचे उपाय आत्मसात करत आहेत.

**निर्माणः**

6. लाँगलाईन मासेमारीतील समुद्री पक्षांच्या आकस्मिक पकडीच्या जागृकतेबद्दल आणि त्याचा समुद्री पक्षांच्या लोकसंख्येवर होणा-या नकारार्थी परिणाम लक्षात घेता, मार्च 1997 मध्ये (कोफी) (COFI) मत्स्य व्यवसाय समितीच्या 22 व्या अधिवेशनात एक प्रस्ताव मांडण्यात आला की एफ ए ओ (FAO) तज्ञ सल्लांगारांबरोबर अतिरिक्त अर्थ संकल्प निधीचा वापर करुन, अशा प्रकारच्या आकस्मिक पकडीमध्ये कपात करण्यासाठी पुढील कोफी सत्र सादर करताना मार्गदर्शक तत्वांची कृती योजना विकसित केली जाईल.

7. लाँगलाईन मासेमारीमध्ये समुद्री पक्षांची होणारी आकस्मिक पकड कमी करण्याच्या दृष्टिने एक आंतरराष्ट्रीय कारवाईची योजना, 25-27 मार्च 1998 मध्ये टोकियो मध्ये झालेल्या एक तांत्रिक कार्य समुहाच्या बैठकी मध्ये विकसित करण्यात आली आणि मासेमारी क्षमतेचे, शार्क व्यवस्थापन, मासेमारी आणि समुद्री पक्षांची लाँगलाईन मासेमारी मध्ये होणारी आकस्मिक पकड याविषयीची सल्ला बैठक 26-30 ऑक्टोबर 1998 मध्ये आणि याबद्दलची तयारी बैठक 22-24 जुलै 1998 मध्ये रोम येथे संपन्न झाली.

**निसर्ग आणि व्याप्तीः**

8. आइ पी ओ ए समुद्री पक्षी स्वैच्छिक आहे. कलम 2(डी) च्या विचाराधीन हे जबाबदार मत्स्य व्यवसाय आचारसंहितेच्या चौकटीत स्पष्ट करण्यात आले आहे. आचारसंहितेच्या कलम 3 च्या तरतुदीची व्याख्या आणि प्रयोग या दस्तावेजासाठी तसेच इतर आंतरराष्ट्रीय उपकरणांशी लागू होतो. सर्व संबंधित राज्यांना हे कार्यान्वित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे

9. ज्या राज्यांच्या पाण्यामध्ये लाँग लाईन मासेमारी आपल्या स्वतःच्या किंवा विदेशी जहाजांद्वारे केली जाते तसेच जे राज्य खोल समुद्रामध्ये किवा इतर राज्यांच्या अनन्य

आर्थिक क्षेत्रामध्ये लॉंगलाईन मासेमारी करतात अशा राज्यांसाठी आई पी ओ ए, समुद्री पक्षी लागू होतो.

**उद्देश्य:**

10. लेख 7.6.9 आणि आचार संहिता 8.5 च्या उद्देशांवर विशेष लक्ष केंद्रित करुन, आइ पी ओ ए समुद्री पक्षी चा उद्देश्य लॉंग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करणे हा आहे.

**अंमलबजावणी:**

11. आई पी ओ ए (IPOA) समुद्री पक्षी ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यांनी काही उपक्रम संच अंमलात आणणे आवश्यक आहे. हे उपक्रम योग्य प्रकारे आणि संबंधित आंतरराष्ट्रीय संघटनांच्या संयोगाने अमलात आणावे. या उपक्रम संचाची अचूक संरचना ही समुद्री पक्षांच्या आकस्मिक पकडीच्या मूल्यांकनावर आधारित केली जाईल.

12. लॉंगलाईन मासेमारीतील समुद्री पक्षांच्या आकस्मिक पकडीमुळे समस्या उत्पन्न होतात का हे पडताळून पाहण्यासाठी,ज्या राज्यांमध्ये लॉंगलाईन मासेमारी केली जाते अशा राज्यांनी या मत्स्य व्यवसायाचे मूल्यांकन केले पाहिजे आणि जर अशा समस्या निर्माण होत असतील तर मत्स्य व्यवसायातील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी राज्यांनी कारवाईच्या राष्ट्रीय योजनेचा अवलंब करावा. समुद्री पक्षांच्या कारवाईच्या राष्ट्रीय योजनेचे अनुभव विकसित करताना प्रादेशिक व्यवस्थापन संस्थने ते योग्य प्रकारे विचाराधीन केले पाहिजे. एफ ए ओ (FAO) ने तज्ञांची एक यादी आणि एन पी ओ ए (NPOA) समुद्री पक्षी विकासासंबंधी तांत्रिकी सहायता यंत्रणा देशाला प्रदान केली पाहिजे.

13. ज्या राज्यांनी निश्चित केले आहे की एन पी ओ ए समुद्री पक्षी ची आवश्यकता नाही, अशा राज्यांनी या निर्णयाचे नियमितपणे विशेषतः त्यांच्या मासेमारीमध्ये झालेल्या बदलाचे जसे की विदयमान मासेमारी आणि/किंवा विकास विस्ताराच्या बदलाचे पूनरावलोकन करावे. अशा राज्यांनी जर समस्या अस्तिवात आहेत असे मान्य केले तर त्यांनी परिच्छेद-12 मध्ये वर्णन केलेल्या कार्यपद्धती अनुसरणे आणि समुद्री पक्षांच्या कारवाईची राष्ट्रीय योजना (एन पी ओ ए समुद्री पक्षी) पुढील दोन वर्षात अंमलात आणली पाहिजे.

14. प्रत्येक संबंधित राज्याच्या एन पी ओ ए समुद्री पक्षी चा भाग म्हणून मूल्यांकनाचा समावेश केला पाहिजे.

15. प्रत्येक राज्य त्यांच्या एन पी ओ ए समुद्री पक्षी च्या रचना, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी जबाबदार आहे.

16. राज्यांनी मान्य केले आहे की प्रत्येक लाँगलाईन मासेमारी ही अव्दितीय आहे आणि योग्य उपशमनाच्या उपायांची ओळख ही संबंधित मासेमारीच्या जागच्या जागी केलेल्या मूल्यधारणेतूनच साध्य करता येईल. काही लाँगलाईन मासेमारी पद्धित समुद्री पक्षांची आकस्मिकरित्या पकड होते अशा पद्धितीमध्ये तांत्रिक आणि कार्यरत उपशमनाचे उपाय सध्या वापरात आहेत किंवा विकासांतर्गत आहेत. विविध राज्यांनी विकसित केलेले उपाय या दस्तावेजाच्या शेवटी एका तांत्रिक टीपमध्ये सूचीबद्ध आहेत. (लाँगलाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्याच्या कारवाईच्या राष्ट्रीय योजनेच्या विकासाची तांत्रिक टीप) ही सूची हा किंवा अन्य कोणताही उपाय विकसित करण्यासाठी किंवा उपयोग करण्यासाठी राज्यांच्या अधिकारावर प्रतिकूल प्रभाव पाडत नाही. एफ ए ओ (FAO) मात्स्यिकी च्या परिपत्रक नं. 137 मध्ये अधिक व्यापक वर्णन आणि उपशमनाचे सध्या वापरात असलेले किंवा विकासांतर्गत उपायांचे स्पष्टीकरण आणि चर्चा यांचा समावेश होतो.

17. राज्यांनी समुद्री पक्षांच्या राष्ट्रीय योजनेच्या कारवाईची अंमलबजावणी कोफीच्या 2001 सत्राच्या आधी करावी.

18. राज्यांनी समुद्री पक्षांच्या राष्ट्रीय योजनेच्या अंमलबजावणीचे नियमितपणे किंवा दर चार वर्षांनी, समुद्री पक्षांच्या कारवाईची परिणामकारकता वाढवण्यासाठी आणि खर्चाच्या प्रभावी धोरण ओळखण्याच्या हेतुने त्यांच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करावे.

19. राज्यांनी लाँगलाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी त्यांच्या क्षमतेच्या आणि आंतरराष्ट्रीय कायदा सुसंगतीच्या चौकटीच्या आत, प्रादेशिक, उपप्रादेशिक मत्स्य व्यवसाय संस्था किंवा व्यवस्था आणि माध्यमांच्या सहकार्यातून, सहकार्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

20. आई पी ओ ए- समुद्र पक्ष्याची (सी बर्डस) अंमलबजावणी करताना जागतिक निसर्गाचा मुद्दा लक्षात घेता ज्या राज्यांमध्ये लाँगलाईन मासेमारी महत्वपूर्ण मानली जाते, अशा राज्यांमध्ये लाँगलाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्याच्या दृष्टीने सहकार्य करणे आवश्यक आहे. राज्यांनी एफ ए ओ (FAO) च्या माध्यमातून तसेच संशोधनातील व्दिपक्षीय आणि बहुपक्षीय व्यवस्था, प्रशिक्षण आणि उत्पादन माहिती आणि जाहिरात सामग्री यांच्या माध्यमातून सहकार्य करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

21. राज्यांनी जबाबदार मत्स्य व्यवसाय आचार संहितेवर एफ ए ओ ला सादर करण्यात येणा-या व्दिवार्षिक अहवालाचा भाग म्हणून त्यांच्या एन पी ओ ए (FAO) - सी बर्डस च्या मूल्यांकन, विकास आणि अंमलबजावणीच्या प्रगतीचा अहवाल सादर करावा.

**एफ ए ओ (FAO) ची भूमिका:**

22. एफ ए ओ (FAO), आपल्या परिषदेने निर्देशित केल्यानुसार आपल्या नियमित कार्यक्रम उपक्रमाचा भाग म्हणून आइ पी ओ ए सी- बर्डची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यांना शक्य तितक्या प्रमाणात सहकार्य करील.

23. एफ ए ओ (FAO), आपल्या परिषदेने निर्देशित केल्यानुसार एन पी ओ ए – सी बर्डच्या प्रगती व अंमलबजावणीसाठी विशिष्ट, देश तांत्रिक सहाय्य प्रकल्प तसेच नियमित उपक्रमाच्या निधीतून आणि या कारणासाठी, संघटनेसाठी उपलब्ध केलेल्या अतिरिक्त अर्थ संकल्पीय निधीचा वापर करुन शक्य तितक्या प्रमाणात सहकार्य करील.

24. एफ ए ओ (FAO), कोफी (COFI) च्या माध्यमातून आई पी ओ ए – सी बर्ड च्या अंमलबजावणीच्या विकासाच्या स्थितीचा व्दिवार्षिक अहवाल सादर करील.

**लॉंगलाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्याच्या राष्ट्रीय योजनेच्या कारवाईच्या विकासावर तांत्रिक सूचना**

**I. मूल्यांकन**

1. या मूल्यांकनाचा मूख्य उद्देश्य लॉंग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांच्या आकस्मिक पकडीचे स्वरुप आणि प्रमाण निर्धारित करणे आहे

2. **मूल्यांकनामध्ये संग्रहण व विश्लेषणाचा समावेश होऊ शकतो, परंतु ते इतकेच मर्यादित नाही.**

- एन पी ओ ए- सी बर्ड च्या मूल्यमापन करण्याच्या गरजेचे निकष
- मासेमारी बोटीची माहिती (आकारानुसार बोटींची संख्या)
- मासेमारी पद्धतीची माहिती ( पेलॅजिक, तलमज्जी पद्धती)
- मासेमारी क्षेत्र
- लॉंग लाईन मासेमारीतील मत्स्य प्रयास (हंगाम, प्रजाती, पकड, गळांची संढया, वर्ष मासेमारी)
- मासेमारी क्षेत्रातील समुद्री पक्षांच्या लोकसंख्येची स्थिती (ज्ञान असेल तर )
- समुद्री पक्षांची एकूण वार्षिक पकड (प्रत्येक 1000 गळांच्या संचाच्या प्रति/प्रजाती, लॉंग लाईन मासेमारी)

- अस्तित्वात आणि वापरात असलेले उपशमनाचे उपाय आणि त्यांची परिणामकारकता
- समुद्री पक्षांच्या आकस्मिक पकडीवर देखरेख (निरीक्षक कार्यक्रम इ.)
- एन पी ओ ए- सी बर्डस् च्या विकास आणि अंमलबजावणीच्या निष्कर्ष आणि निर्णयाविषयाचे विधान

## II. एन पी ओ ए- सी बर्डस- समुद्री पक्षांच्या कारवाईची राष्ट्रीय योजना

**एन पी ओ ए- सी बर्डस मध्ये खालील बाबी समाविष्ट आहेत**

### 1. उपशमनाच्या उपायांचे लिखित नियम

एन पी ओ ए – सी बर्डस ने उपशमनाचे योग्य उपाय लिहिले पाहिजे. ही उपाययोजना कार्यक्षम आणि मासेमारीसाठी खर्चाच्या दृष्टीने प्रभावी सिद्ध होणे आवश्यक आहे. जर उपशमनाचे विविध उपाय किंवा साधने एकत्र करुन उपशमनाच्या उपाय योजनांची परिणामकारकता सुधारली तर प्रत्येक राज्यांना विशिष्ट लाँगलाईन मासेमारी मध्ये विशिष्ट परिस्थितीमध्ये विविध उपाययोजनांच्या अंमलबजावणीची गरज परावर्तीत करणे फायदेशीर ठरेल.

### 2. संशोधन आणि विकास

एन पी ओ ए – सी बर्डस मध्ये संशोधन आणि विकासाकरीता उपाययोजना करणे आवश्यक आहे. या बाबीवर लक्ष्य केंद्रित करुन
(i) व्यावहारीक आणि प्रभावी समुद्री पक्षांच्या निवारक साधनांचा विकास करणे. (ii) समुद्री पक्षांची प्रासंगिक पकड कमी करणा-या इतर तंत्रज्ञान आणि पद्धतींचा विकास करणे (iii) अशा प्रकारच्या समस्या उदभवणा-या लाँगलाईन मासेमारी पद्धतीतील उपशमनाच्या उपायांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करण्यासाठी विशिष्ट संशोधन करणे.

### 3. शिक्षण, प्रशिक्षण आणि प्रचार

एन पी ओ ए- सी बर्डस ने कोळी, मासेमारी संघटना आणि इतर संबंधित गटांमध्ये लाँग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्याविषयांची जागरुकता निर्माण करण्यासाठी, लाँगलाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्याविषयी, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उपायांच्या कारवाईचे आणि राष्ट्रीय उद्योगांमध्ये संशोधन आणि त्यांच्या स्वतःच्या प्रशासनामध्ये एन पी ओ ए- सी बर्डच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन देण्याविषयीची, जागरुकता निर्माण करण्यासाठी नियम लिहिले पाहिजेत. समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्याविषयीची तांत्रिक किंवा आर्थिक मदतीविषयीची माहिती पुरवणे मच्छिमार, मत्स्य व्यवस्थापक, जाळी तंत्रज्ञ, सागरी आर्किटेक्ट, बोटी बांधणारे आणि

संरक्षणकर्ते आणि इतर इच्छुक लोक यांच्यासाठी आऊटरिच उपक्रमांची विशेष रचना व अंमलबजावणी करणे. अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे लक्ष्य, हे समुद्री पक्षांची आकस्मिक पकड आणि उपशमनाचे उपाय यांसारख्या समस्या समजून घेऊन त्यावर सुधारणा करणे हे असले पाहिजे. आऊटरिच कार्यक्रमांमध्ये शैक्षाणिक अभ्यासक्रम पोस्टर, माहितीपत्रक (Hand Book) आणि व्हिडीओ यांमधून मार्गदर्शन यांचा समावेश असला पाहिजे. या कार्यक्रमाने अशा समस्यांच्या संवर्धनाच्या दोन्ही पैलूंवर तसेच समुद्री पक्षांमुळे चारा माशांचे होणारे नुकसान कमी करण्यासोबतच अपेक्षित मासेमारी वाढीतील कार्यक्षमता व आर्थिक लाभ यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

## 4. माहिती संग्रहण

माहिती संकलनाच्या कार्यक्रमांमध्ये लाँग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड आणि त्यांच्या उपशमनाच्या उपायांची परिणामकारकता या विषयांची विश्वसनीय माहिती गोळा केली पाहिजे. अशा कार्यक्रमांसाठी बोटीवरील निरीक्षकाचा वापर सुद्धा केला जाऊ शकतो.

लाँग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्याचे काही वैकल्पिक, तांत्रिक आणि कार्यरत उपाय यांवर तांत्रिक सूची

## I. परिचय

समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करण्यासाठी, समुद्री पक्षी व गळाचा चारा यांतील चकमकींची संख्या कमी करणे आवश्यक आहे. जर का त्यांचा संयोजनामध्ये वापर केला तर या पर्यायांचा उपशमनासाठी प्रभावीपणे वापर केल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

प्रत्येक उपायांसाठी प्रभावीपणा आणि खर्च थोडक्यात सादर करणे आवश्यक आहे. समुद्री पक्षांची आकस्मिक पकड किती प्रमाणात कमी होते यावर “प्रभावीपणा” ची व्याख्या ठरवली जाते. खर्च म्हणजे प्रारंभिक खर्च किंवा गुंतवणूक आणि कोणताही सुरू असलेला व्यवस्थापकीय खर्च. इतर तांत्रिक पर्याय सध्या विकासाच्या मार्गावर आहेत आणि या क्षेत्रातील मच्छिमार व संशोधक उपशमनाचे नवीन उपाय विकसित करू शकतात, जेणेकरून उपाययोजनांची माहिती वेळेनुरुप वाढू शकते.

जर उपशमनांच्या उपाययोजनांची परिणामकारकता विविध उपाययोजना किंवा साधने एकत्रित करुन सुधारित केली, तर प्रत्येक राज्यांना विविध उपाययोजना ज्या त्यांच्या राज्यांच्या परिस्थितीसाठी योग्य आहेत आणि त्यांच्या विशिष्ट लाँगलाईन मासेमारीची गरज परावर्तित करते अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करणे फायदेशीर ठरते.

खाली दिलेली यादी अनिर्वाय किंवा संपूर्ण मानली जाऊ नये आणि एफ ए ओ (FAO) ने वापरात असलेले तसेच विकासांतर्गत असलेल्या माहिती संकलनाची देखरेख करावी.

## II. तांत्रिक उपाय

### 1. चा-याचा विहित दर वाढवणे

(a) लॉंग लाईन जाळ्याचे भारांकन करणे

**संकल्पनाः-** चारायुक्त आकडयांची बुडण्याची गती वाढवणे व त्यांचा समुद्री पक्षांसोबत संपर्कात येण्याचा काळ कमी करणे

**परिणामकारकताः**- अभ्यासातून असे सिद्ध झाले आहे की योग्य भारांकित लाईनचा वापर, समुद्री पक्षांमुळे चा-यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे.

**खर्चः** खर्च म्हणजे भारांकित साहित्याच्या खरेदीचा प्रारंभिक खर्च (जड जाळी किंवा वजन) आणि मासेमारीच्या वेळी गमावलेल्या कोणत्याही वजनाची बदली असा असू शकतो.

(b) (Thawing) चारा:

**संकल्पनाः** (ThawingThawing) किंवा आणि (Puncturing) स्विमबलाड्डर swimbladder) मुळे चारा माशांच्या तरंगण्याच्या समस्येवर मात.

**परिणामकारकताः** (Thawed) चारा मासा वापरल्यामुळे समुद्री पक्ष्यांच्या आकस्मिक पकडीचा दर कमी होतो. असे सुद्धा दर्शवण्यात आले आहे की चारा मासा with deflated swim bladder हा inflated swimbladder पेक्षा लवकर बुडतो.

**खर्चः** काही मासेमारीमध्ये, प्रारंभिक खर्चामध्ये लाईन- सेटिंग साधनांच्या खरेदीचा समावेश असतो.

### 2. धबधबा, कूपी किंवा फनेल सारख्या पाणी व्यवस्थेच्या खाली

**संकल्पनाः** लाईनची पाण्याच्या खाली व्यवस्था करुन समुद्री पक्षांचा चारा माशाशी होणारा संपर्क प्रतिबंधित करणे.

**परिणामकारकताः** पाण्याच्या खाली लाइनची व्यवस्था करण्याची यंत्रणा जरी विकासाअंतर्गत असली तरी ती अधिक प्रभावशील आहे.

**खर्चः**- प्रारंभिक खर्चामध्ये पाण्याच्या खाली व्यवस्था करणा-या यंत्रणेच्या खरेदीचा समावेश आहे.

**3. गळाचा चारा पाण्यात प्रवेश करणा-या क्षेत्राच्या आत किंवा वर पक्षांना घाबरवणा-या लाईनची व्यवस्था**

**संकल्पनाः** चारामाशांचा पाण्यात प्रवेश करणा-या क्षेत्रामध्ये समुद्री पक्षांचा होणारा संपर्क प्रतिबंधित करणे. पक्षांना घाबरवण्यात येणा-या लाईनची रचना अशा प्रकारे करणे जेणेकरून पक्षांचा गळाच्या चारामाशाशी होणारा संपर्क प्रतिबंधित होईल. रचनेची वैशिष्टता ही बोट, मासेमारी पद्धत आणि स्थान व त्यांची परिणामकारकता यानुसार बदलणे, स्टिमर (Streamer line) व थॉईंग बॉयस (Thawing buoys) तंत्रज्ञानाची उदाहरणे आहेत.

**परिणामकारकताः** पक्षांना घाबरवण्यात येणा-या संरक्षित क्षेत्राच्या खाली करण्यात येणा-या चारा माशांच्या वितरणामुळे समुद्री पक्षांची गळाच्या चा-याशी होणारी उपलब्धता कमी करणे. चारामाशांच्या यंत्रणेच्या वापरामुळे किवा पक्षांना घाबरवणा-या लाईनच्या न वापरामुळे किंवा चारामाशांना, पक्षांना घाबरवण्यात येणा-या लाईनच्या संरक्षित क्षेत्रामध्ये न ठेवल्यामुळे किती प्रमाणात चा-याचे नुकसान होते याचे अद्याप निवारण केले गेले नाही.

**खर्चः** पक्षांना घाबरवणा-या लाईनच्या खरेदीसाठीचा प्रारंभिक खर्च कमी आहे.

4. **चारा Casting मशीन/यंत्रणा**

**संकल्पनाः** पक्षांना घावरवण्यात येणा-या लाईनच्या संरक्षित क्षेत्रामध्ये आणि जहाजाच्या पंख्यामुळे निर्माण झालेल्या वादळाच्या क्षेत्राच्या बाहेर चारा माशांना ठेवणे.

**परिणामकारकताः** पक्षी घाबरवण्याच्या लाईनच्या संरक्षित क्षेत्रांतर्गत करण्यात आलेल्या चारा माशांच्या वितरणामुळे समुद्री पक्षांची गळाच्या चारा माशांशी होणारी उपलब्धता कमी होते. चारा (casting) यंत्रणेच्या वापरामुळे, पक्षांना घाबरवण्यात येणा-या लाईनचा वापर न करता किवा चारामाशांना संरक्षित न केल्यामुळे किती प्रमाणात चा-याचे नुकसान होते याचे अदयाप विवरण करणे बाकी आहे.

**खर्चः** चारा यंत्रणेच्या खरेदीसाठी जास्त प्रारंभिक खर्चाचा समावेश होतो.

**5. पक्षांना घाबरवण्यासाठी वापरण्यात येणारे पडदेः**

**संकल्पनाः** माशांच्या हॉलिंगच्या (hauling) वेळी, पक्षांना घाबरवण्यासाठी वापरण्यात येणा-या पडदयाचा वापर करून समुद्री पक्षांचे गळाचा चारा घेणे नाऊमेद करणे

**परिणामकारकताः** उपख्यानात्मक पुरावा असे सूचित करतो की पक्षी घाबरवण्यासाठी वापरण्यात येणारे पडदे हॉलिंग क्षेत्रामधील समुद्री पक्षांचे चारा मासा जप्त करण्यापासून परावृत्त करतात.

**खर्चः** साधनांसाठी कमी खर्च.

**6. कृत्रिम चारा मासा किंवा सापळाः**

**संकल्पनाः** चारा माशांची उपलब्धता किंवा स्वादिष्टपणा कमी करणे.

**परिणामकारकताः** नवीन चारा मासा अदयाप विकासांतर्गत आहे आणि त्याची परिणामकारकता अजून निश्चित करणे बाकी आहे.

**खर्चः** अदयाप माहीत नाही.

**7. गळांमधील बदलः**

**संकल्पनाः** ज्या गळांच्या पद्धतीच्या वापरामुळे समुद्री पक्षी गळाच्या चा-याला लागून पकडण्याची शक्यता कमी होते अशा पद्धतीचा वापर करणे

**परिणामकारकताः** गळाचा आकार, समुद्री पक्षांचा आकस्मिक पकडीच्या प्रजांतीवर परिणाम करु शकतात

**खर्चः** अज्ञात

**8. ध्वनी निवारकः**

**संकल्पनाः** पक्षांना लाँग लाईन पासून परावृत्ता करण्यासाठी उच्च वारंवारता, उच्च ध्वनी, संकट कॉल यांसारख्या ध्वनी संकेताचा वापर.

**परिणामकारकताः** पार्श्व भूमीचा उच्च आवाज आणि अशा प्रकारच्या आवाजांची सवय, समुद्री पक्षांमध्ये अतिशय सामान्य असल्याकारणामुळे यांची परिणामकारकता कमी आहे.

**खर्चः** अज्ञात.

**9. पाण्याची तोफः**

**संकल्पनाः** उच्च दाबाच्या पाण्याचा वापर करुन गळाच्या चारा माशांना लपवणे

**परिणामकारकताः** या पद्धतीच्या परिणामकारकते विषयी निश्चित अनुमान नाही.

**खर्चः** अज्ञात

**10. चुंबकीय निवारकः**

**संकल्पनाः** चुंबकीय क्षेत्र तयार करुन पक्षांचे चुंबकीय रिसेप्टर्स अस्तव्यस्त करणे

**परिणामकारकताः** प्रात्यक्षित प्रयोगामध्ये याच्या प्रभावीपणाचा कोणताच संकेत नाही

**खर्चः** अज्ञात

III. **कार्यरत उपायः**

1. चा-याची दृश्यता कमी करणे (रात्रीच्या वेळी व्यवस्था)

**संकल्पनाः** अंधारात व्यवस्था करणे व गळाच्या चा-याचे पाण्यातील प्रदीपन कमी करणे

**परिणामकारकताः** ही पद्धत सर्वसाधारणपणे अतिशय प्रभावी म्हणून प्रचालित आहे. परंतु हा प्रभावीपणा माशांचे स्थान, हंगाम आणि समुद्री पक्षांच्या प्रजातीप्रमाणे बदलू शकतो या पद्धतीची परिणामकारकता पौर्णिमेच्या वेळी कमी असू शकते

**खर्चः** अंधारामध्ये कराव्या लागणा-या अशा प्रकारच्या लाईन सेटिंगच्या बंधनामुळे, मासेमारीच्या क्षमतेवर मुख्यतेकरुन छोटया लाँग लाईनवर त्याचा परिणाम होतो. जहाजावर योग्य प्रमाणात प्रकाशित करण्याचा खर्च कमी आहे .

**2. समुद्री पक्षांचे जहाजांच्या प्रति आकर्षण कमी करणेः**

**संकल्पनाः** समुद्री पक्षांचे जहाजाप्रतिचे आकर्षण कमी केल्यामुळे समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी होण्याची संभावना आहे. जहाजातून बाहेर टाकलेली सामग्री (उदा. बेकार मासे, कचरा) एकाच वेळी किंवा पक्षांना कमीत कमी प्रमाणात उपलब्ध झाली पाहिजे किंवा त्यांचे नुकसान होण्याची संभावना कमी असली पाहिजे. यांमध्ये बुडलेले गळ, बेकार मासे, कचरा, माशांचे डोके इत्यादी फेकण्यापासून परावृत्त करणे याचा समावेश आहे. जर या गोष्टी फेकणे अपरिहार्य असेल तर ते जहाजाच्या विरुद्ध दिशेला (लाईन सेट केल्याच्या) करणे गरजेचे आहे जेणे करुन पक्षी तेथे आकर्षित होणार नाहीत (उदा. रात्री)

**परिणामकारकताः** कचरा विल्हेवाट करण्याचा मुद्दा जटील आहे आणि आजपर्यंत केलेल्या अभ्यासातून विविध प्रक्रियांच्या परिणामकारकते बद्दल परस्पर विरोधी निर्णय देण्यात आले आहेत.

**खर्चः** कमी काही परिस्थितीमध्ये जहाजावरील केर कच-याचा समावेश हा केरकचरा पुर्नविघटन तंत्रासोबत जोडला गेला आहे.

**3. क्षेत्र आणि हंगामी बंद**

**संकल्पनाः** समुद्री पक्षांच्या प्रजननाच्यावेळी किंवा सकेंद्रणावेळी समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करणे

**परिणामकारकताः** अन्य समुद्री पक्षांच्या क्षेत्रामध्ये मासेमारी बोटीचे विस्थापन करण्याच्या गरजेवर विचार करताना क्षेत्र आणि हंगामी बंद (जसे की उच्च घनत्व चारा किंवा पिल्लांच्या प्रभावी देखभालीच्या काळात जेव्हा प्रौढ पक्षांना प्रजनन क्षेत्रापासून दूर उडण्यासाठी असणा-या बंधनामुळे) परिणामकारक आहे.

**खर्चः** अज्ञात परंतु क्षेत्र आणि हंगामी मासेमारीवरील बंधनाचा मासेमारी क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

**4. ज्या जहाजां मध्ये उपशमनाच्या उपायांचा वापर केला जातो व ज्यांना अनुपालन देखरेखीची गरज नाही अशा जहाजांना परवाना देण्यासाठी पसंती देणे**

**संकल्पनाः** ज्या उपशमनाच्या उपायांचा वापर करण्यासाठी अनुपालन देखरेखीची गरज नाही अशा उपायांना प्रोत्साहन प्रदान करणे.

**परिणामकारकताः** उपशमनाच्या उपायांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि समुद्री पक्षांची आकस्मिक पकड कमी करणा-या मासेमारी पद्धतींचा विकास यांसाठी प्रभावी असू शकते.

**खर्चः** अज्ञात

**5. जिवंत पक्षांना सोडून देणे**

**संकल्पनाः** खबरदारीचे सर्व उपाय अवलंबून सुद्धा जर समुद्री पक्षांची आकस्मिक पकड झालीच तर समुद्री पक्षांना बोटीवर जिवंत आणणे व त्यांना पाण्यात जिंवतपणे सोडण्याचे सर्व वाजवी प्रयत्न केल्याची खात्री करणे आणि शक्य असेल तेव्हा गळ काढून पक्षांना जीवदान देणे

**परिणामकारकताः** पक्षांना जिवंतपणे बोटीवर आण-याच्या संख्येवरून आणि ही संख्या लाईन सेटिंगमुळे मेलेल्या पक्षांच्या तुलनेत कमी असण्यावर परिणामकारकता अवलंबून आहे.

**खर्चः** अज्ञात

## शार्कच्या संरक्षण तथा व्यवस्थापन हेतु कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना

### परिचय

1. शेकडो वर्षापासून पारंपारिक मच्छिमा-यांनी शार्कच्या संवर्धनासाठी किना-यालगत मासेमारी केली आहे. आणि काही अजूनही करत आहेत परंतु अलिकडच्या काही दशकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व दूर बाजारात प्रवेश यांच्या संयोजनातून शार्कच्या उत्पादनामध्ये वाढ झाली आहे तसेच मासेमारीच्या क्षेत्राचाही विस्तार झाला आहे.

2. शार्कच्या वाढत्या पकडीमुळे चिंता उत्पन्न होत आहे तसेच त्याचा परिणाम जगाच्या महासागरातील अनेक क्षेत्रातील शार्कच्या काही प्रजातीच्या लोकसंख्येवरही होत आहे. कारण शार्कच्या अनेकदा असणारा साठा भरतीचा जवळचा संबंध, वाढत्या मासेमारीच्या प्रतिसाठा प्रति पुर्नप्राप्तीचा दीर्घ

कालावधी (उशीरा लैंगिक परिपक्वतेमुळे अल्प जैविक उत्पादन, अत्यल्प माशांची पिल्ले, यद्यपि कमी नैसर्गिक मृत्युदर आणि गुंतागुतीची विशिष्ट संरचना (आकार,लिंग विषमता आणि हंगामी स्थलांतर )

3. शार्कची उपलब्ध पकड, प्रयास, लैंडिग आणि व्यापार यांविषयीच्या माहितीच्या अभावामुळे तसेच अनेक प्रजातींचे जैविक घटक व ओळख याविषयीच्या मर्यादित माहितीमुळे तसेच शार्कविषयीच्या ज्ञानाची सदय माहिती आणि शार्क मासेमारीतील कामाच्या पद्धती, शार्कच्या संवर्धन व व्यवस्थापनामध्ये समस्या निर्माण करतात. शार्कच्या ज्ञानाविषयीचे सदय स्थितीतील ज्ञान वाढवण्यासाठी तसेच आवश्यक माहिती संग्रहणाच्या सोयीसाठी आणि संशोधन व व्यवस्थापनेसाठी पूरेशा निधीची आवश्यकता आहे

4. प्रचलित दृश्य असे आहे की निर्देशित शार्कच्या पकडीचे आणि काही विविध प्रजातींच्या मासेमारीत शार्कचा लक्षणीय अप्रधान म्हणून समावेश होतो, त्यांचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. काही बाबींमध्ये तत्काल व्यवस्थापनेची गरज भासू शकते.

5. काही देशांमध्ये शार्क पकडीच्या व्यवस्थापनेसाठी विशिष्ट योजना आहेत. ज्यांमध्ये प्रवेश नियंत्रण, तांत्रिक उपायांमध्ये शार्कची अप्रधान पकड कमी करण्याचे उपाय आणि शार्कचा पूर्णपणे वापर करण्यासाठी समर्थन यांचा समावेश होतो. तथापि महासागरातील शार्कचे व्यापक वितरण आणि अनेक प्रजातींचे प्रदीर्घ स्थलांतरण यांमुळे शार्क व्यवस्थापन योजनेसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि समन्वय स्थापन करणे अतिशय महत्वपूर्ण आहे. सदय स्थितीत परिणामकारकरित्या शार्कच्या पकडीसाठी क्वचित काही आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन यंत्रणा उपलब्ध आहे.

6. आंतर-अमेरिका उष्ण कटीबंधीय टूना आयोग, सागरी शोधासाठी आंतरराष्ट्रीय परिषद, अटलांटिक टूनाच्या संरक्षण हेतु आंतरराष्ट्रीय आयोग, उत्तर-पश्चिमी अटलांटिक मात्स्यिकी संस्था, पश्चिम-आफ्रिकी राज्यांचे उपप्रादेशिक मात्स्यिकी आयोग, मात्स्यिकी विकास हेतु लॅटिन अमेरिकन संस्था, हिंद-महासागर टूना परिषद, दक्षिणी ब्लू फिन टूनाच्या संरक्षण हेतु परिषद आणि प्रशांत (पॅसिफिक) समूदयातील महासागरीय मात्स्यिकी कार्यक्रमांनी शार्क विषयांची माहिती गोळा करण्यासाठी सदस्य देशांना प्रोत्साहीत करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे आणि काही बाबतीत साठा निर्धारण हेतु प्रादेशिक माहिती संकलनाचा विकास केला आहे.

7. शार्कच्या वाढत्या पकडीबाबतची चिंता आणि त्याचा शार्कच्या लोकसंख्येवरील नकारार्थी परिणाम यांची नोंद करुन मार्च 1997 मध्ये एफ ए ओ (FAO) च्या मत्स्य व्यवसाय समितीच्या 22 व्या अधिवेशनात एक प्रस्ताव मांडण्यात आला की एफ ए ओ (FAO) तज्ञ सल्लागारांबरोबर अतिरिक्त अर्थ संकल्प निधीचा वापर करुन शार्कच्या संवर्धन व व्यवस्थापनेसाठी मार्गदर्शक तत्वांची कृतीयोजना समितीच्या पुढील सत्रामध्ये मांडणे.

8. शार्कच्या संवर्धन तसेच व्यवस्थापन हेतु कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना, शार्कच्या संवर्धन व व्यवस्थापनेच्या तांत्रिक कार्य समुहाच्या 23-27 एप्रिल 1998 मध्ये टोकियो मध्ये झालेल्या बैठकीत विकसित झाली आणि मासेमारी क्षमतेचे व्यवस्थापन, शार्क लॉंग लाईन मासेमारीतील समुद्री पक्षांची आकस्मिक पकड यावरील सल्ला बैठक 26-30 ऑक्टोबर 1998 मध्ये रोम मध्ये संपन्न झाली आणि याविषयीची तयारी बैठक 22-24 जुलै 1998 मध्ये रोम मध्ये झाली.

9. या दस्तावेजामध्ये दर्शविल्याप्रमाणे आई पी ओ ए (IPOA) - शार्क मध्ये स्वरुप व व्याप्ती, तत्वे, उद्देश आणि अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रिया (संलग्नक समावेश) यांचा समावेश आहे.

10. आई पी ओ पी (IPOA) – शार्क ऐच्छिक आहे. कलम 2 (डी) च्या विचाराधीन हे जबाबदार मत्स्य व्यवसाय आचारसंहितेच्या चौकटीत स्पष्ट करण्यात आले आहे. आचार संहितेच्या कलम (3) च्या तरतुदी, या दस्तावेजाच्या व्याख्या आणि प्रयोग तसेच त्याचा इतर आंतरराष्ट्रीय उपकरणांशी असलेला संबंध यांच्याशी लागू होतो. सर्व संबंधित राज्यांना हे कार्यान्वित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

11. या दस्तावेजाच्या उद्देश हेतू, शार्कच्या व्याख्येच्या अंतर्गत शार्कच्या सर्व प्रजाती, स्केटस, रेज आणि कायमेराज- Chimacras (Class- chondryhthyes) चा समावेश होतो. तसेच शार्क पकड या व्याख्येअंतर्गत अप्रधान, व्यावसायिक, मनोरंचनासाठी पकडल्या जाणा-या शार्कचा समावेश होतो

12. आई पी ओ ए (IPOA) – शार्क मध्ये दोन्ही लक्ष्य आणि गैरलक्ष्य पकड यांचा समावेश होतो.

**मार्गदर्शक तत्वेः**

13. **भागीदारी.** ज्या राज्यांचा माशांच्या प्रजातीच्या किंवा साठ्यांच्या मृत्युदरामध्ये योगदान आहे त्या राज्यांनी या व्यवस्थापने मध्ये सहभागी झाले पाहिजे.

14. **कायमस्वरुपी साठा.** प्रतिबंधात्मक उपायांचा वापर करुन मासेमारीच्या प्रत्येक साठयाचा मृत्युदर संवर्धन पातळीच्या आत ठेवणे हे व्यवस्थापन आणि संवर्धन धोरणाचे उदिद्ष्ट असले पाहिजे

15. **पौष्टिक आणि सामाजिक आर्थिक विचार.** व्यवस्थापन आणि संवर्धनाच्या उदिद्ष्ट आणि धोरणांनी हे समजून घेतले पाहिजे की काही कमी उत्पन्न व अन्नाची कमतरता असलेल्या क्षेत्रांमध्ये किंवा देशांमध्ये शार्कची पकड हा अन्न, रोजगार आणि उत्पन्नाचा एक

पारंपारिक आणि अतिमहत्वचा स्त्रोत आहे. अशा पकडीचे व्यवस्थापन, स्थानिक समूदयाला अन्न, रोजगार व उत्पन्नाचे निरंतर स्त्रोत पुरवण्यासाठी शाश्वतीच्या आधारावर केले पाहिजे.

**उद्देश**

16. आई पी ओ ए (IPOA) – शार्कचा उद्देश्य शार्कचे संवर्धन आणि व्यवस्थापन करणे व त्यांचा दीर्घकालीन वापर करणे हा आहे.

17. आई पी ओ ए (IPOA) – शार्क अशा राज्यांना लागू होतो, ज्या राज्यांच्या पाण्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या किंवा परदेशी जहाजांकडून शार्कची पकड केली जाते तसेच महासागरामध्ये ज्या राज्यांच्या जहाजांकडून शार्कची पकड केली जाते.

18. राज्यांनी जर त्यांच्या जहाजांना शार्क पकडीसाठी निर्देशित केले असेल किंवा त्यांची जहाजे जर गैरनिर्देशित मासेमारीमध्ये नियमितपणे शार्कची पकड करत असतील तर अशा राज्यांनी शार्क साठयाच्या संवर्धन व व्यवस्थापनेसाठी कारवाईच्या राष्ट्रीय योजनेचा अवलंब करावा. शार्क योजनेसाठी सुचवलेले मुद्दे परिशिष्ट-अ मध्ये आढळले आहेत. शार्क योजनेसाठी सुचवलेले मुद्दे परिशिष्ट- अ मध्ये आढळले आहेत. शार्क योजना विकसित करताना उपप्रादेशिक आणि प्रादेशिक मत्स्य व्यवसाय व्यवस्थापन संस्थेचा अनुभव योग्य प्रकारे विचारात घेतला पाहिजे.

19. प्रत्येक राज्य त्यांच्या शार्क योजनेच्या अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी जबाबदार आहे.

20. प्रत्येक राज्यांनी 2001 च्या कोफी (COFI) सुत्रानुसार शार्क योजनेसाठी प्रयत्न केला पाहिजे.

21 प्रत्येक राज्यांनी शार्क योजनेच्या विकासाची गरज आहे का हे ठरवण्यासाठी मासेमारीच्या दृष्टीने शार्क साठ्याच्या स्थितीचे नियमित मूल्यांकन केले पाहिजे. हे मूल्यांकन जबाबदार मासेमारीच्या आचारसंहितेच्या कलम 6.13 च्या मार्गदर्शनाने केले पाहिजे. हे मूल्यांकन प्रत्येक संबंधित राज्याच्या शार्क योजनेचा भाग म्हणून नोंदविले पाहिजे. शार्क मूल्यांकन अहवालाचे सूचित मुद्दे परिशिष्ट-ब मध्ये आढळून आले आहेत. सूसंगत माहितीचे संकलन, व्यावसायिक माहितीचा समावेश, सुधारित प्रजातींची ओळख यांच्याशी संबंधित माहिती, भरपूर प्रमाणात निर्देशकांची स्थापना या बाबी मूल्यांकनासाठी अनिवार्य ठरतात राज्यांनी संग्रहीत केलेली माहिती संबंधित उपप्रादेशिक आणि प्रादेशिक मात्स्यिकी संख्या आणि एफ ए ओ (FAO) च्या चौकटीत योग्य प्रकारे उपलब्ध करुन देणे आणि चर्चा करणे ट्रान्सबाऊंडरी, स्ट्रँडलिंग, अत्यंत स्थलांतरीत आणि महासागरातील

शार्कच्या साम्यांशी संबंधित माहिती संग्रहण आणि साठयाच्या निर्धारणाची माहिती सहभाजन प्रणाली याविषयांचे आंतरराष्ट्रीय सहकार्य विशेषतः महत्वपूर्ण आहे.

**22. शार्क योजनांचे उद्दिष्ट खालील प्रमाणेः-**

- निर्देशित आणि गैरनिर्देशित मासेमारीमध्ये शार्कची पकड शाश्वत आहे हे सूनिच्छित करणे
- शार्कच्या लोकसंख्येला असणा-या धोक्यांचे मूल्यांकन करणे, गंभीर प्राकृतिक स्थान ठरवणे आणि संरक्षित करणे आणि जैविक शाश्वता व प्रादेशिक दीर्घकालीन आर्थिक वापरांच्या तत्वांसोबत सुसंगत धोरणांची अंमलबजावणी करणे.
- असुरक्षित आणि धोक्यात असलेल्या शार्कना ओळखणे व त्यांना विशेष लक्ष पुरवणे
- राज्यांतर्गत आणि राज्यांमधील संशोधन, व्यवस्थापन आणि शैक्षणिक पुढाकारातील सर्व भागदारकांचा समावेश असलेल्या सल्ल्याचे स्थापन आणि प्रभावी समन्वयाच्या चौकटीचा विकास करणे
- न वापरलेल्या प्रासंगिक शार्कची पकड कमी करणे
- जैवविविधतेतील आणि पर्यावरणातील रचना आणि कार्याच्या संरक्षणासाठी योगदान देणे
- जबाबदार मासेमारी पद्धतीच्या आचार संहितेच्या कलम 7.2.2 (जी) च्या अनुसार शार्क पकडीमधील कचरा कमी करणे. (उदा. पंख काढलेल्या शार्क धारणेची आवश्यकता)
- मेलेल्या शार्कचा पूर्णपणे वापर करण्यासाठी प्रोत्साहन देणे
- सुधारीत प्रजाती सुलभीकरणः शार्क पकडीवर देखरेख आणि शार्कच्या विशिष्ट पकड आणि लँडीगची माहिती विकसित करणे

**विशिष्ट प्रजातीच्या जैविक आणि व्यापाराविषयीची माहितीची ओळख आणि अहवाल सुधारणे**

23. ज्या राज्यांमध्ये शार्क योजनेची अंमलबजावणी होते अशा राज्यांनी नियमितपणे किंवा किमान दर चार वर्षांनी प्रभावी धोरण तसेच वाढती परिणामकता ओळखण्याच्या हेतुने अंमलबजावणीचे मूल्यांकन केले पाहिजे.

24. ज्या राज्यांनी असे ठरविले आहे की शार्क योजनेची आवश्यकता नाही अशा राज्यांनी या निर्णयाचे नियमितपणे, विशेषतः त्यांच्या मासेमारीत झालेल्या बदलांचे, कमीत कमी पकड करुन लँडिंग आणि व्यापाराविषयीची माहिती गोळा करून पुनरावलोकन केले पाहिजे.

25. राज्यांनी आंतरराष्ट्रीय कायदयाच्या सुसंगत व त्यांच्या संबंधित चौकटीच्या क्षमतेच्या आत प्रादेशिक आणि उपप्रादेशिक मत्स्य व्यवसाय संख्या किंवा व्यवस्था यांच्या

माध्यमातून, शार्क साम्याच्या शाश्वतीची खात्री देऊन तसेच शक्य तेथे उपप्रादेशिक आणि प्रादेशिक शार्क योजनांचा विकास लक्षात घेऊन सहकार्य केले पाहिजे.

26. दोन किंवा अधिक राज्यांकडून जेथे ट्रान्सबाऊंडरी, स्ट्रॅडलिंग, अत्यंत स्थलांतरीत आणि महासागरातील साठयाचे शोषण केले जाते अशा राज्यांनी साठयाचे प्रभावी संवर्धन आणि व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

27. राज्यांनी संशोधन, प्रशिक्षण आणि माहिती व शैक्षणिक साहित्य उत्पादनातून एफ ए ओ (FAO) च्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या माध्यमातून सहकार्य करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

28. राज्यांनी एफ ए ओ (FAO) ला जबाबदार मत्स्य व्यवसाय आचार संहितेवर सादर करण्यात येणा-या त्यांच्या व्दैवार्षिक अहवालाचा भाग म्हणून शार्कच्या योजनेच्या विकास, मूल्यांकन आणि अंमलबजावणीच्या प्रगतीचा अहवाल सादर करणे.

**एफ ए ओ (FAO) ची भूमिकाः-**

29. एफ ए ओ (FAO), आपल्या परिषदेने निर्देशित केल्यानुसार आपल्या नियमित कार्यक्रम उपक्रमाचा भाग म्हणून आई पी ओ ए – शार्कची अंमलबजावणी करण्यासाठी शक्य तितक्या प्रमाणात सहकार्य करील.

30. एफ ए ओ (FAO) ने आपल्या परिषदेने निर्देशित केल्यानुसार एन पी ओ ए – शार्कचा विकास आणि अंमलबजावणीसाठी, विशिष्ट देश तांत्रिक सहाय्य प्रकल्प तसेच नियमित उपक्रमाच्या निधीतून आणि या कारणासाठी संघटनेसाठी उपलब्ध केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय निधींचा वापर करुन शक्य तितक्या प्रमाणात सहकार्य करील.

31. एफ ए ओ (FAO) कोफी च्या माध्यमातून आइ पी ओ ए – शार्कच्या अंमलबजावणीच्या विकासाच्या स्थितीचा व्दिवार्षिक अहवाल सादर करील.

**परिशिष्ट अ**

## शार्क योजनेतील सूचित मुद्दे

### I. पार्श्वभूमी

शार्क मासेमारीचे व्यवस्थापन करताना, शार्क विषयीचे ज्ञान आणि शार्क पकडीच्या कार्यपद्धती या शार्कच्या संवर्धन आणि व्यवस्थापनेमध्ये समस्या निर्माण करु शकतात हे विचाराधीन असणे महत्वाचे आहे.

- वर्गीकरण विज्ञानासंबंधीच्या समस्या
- शार्कची पकड, प्रयास आणि लँडींगविषयांची अपूरी माहिती
- लैंडिग नंतर प्रजाती ओळखण्यामध्ये आलेल्या समस्या
- जैविक आणि पर्यावरणाविषयांची अपुरी माहिती
- संशोधन आणि व्यवस्थापनेसाठी असणारा अपुरी निधी
- ट्रान्सबाऊन्डरी, स्ट्रँडलिंग, अत्यंत स्थलांतरीत आणि महासागरातील शार्कचा साठा याविषयींच्या गोळा केलेल्या माहितीमध्ये समन्वयाचा अभाव
- विविध प्रजातीची मासेमारी ज्यांमध्ये शार्क पकडले जातात, त्यामध्ये शार्कचे व्यवस्थापन करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये आलेल्या समस्या.

### II. शार्क योजनेचे मुद्देः-

एफ ए ओ (FAO) च्या विकासांतर्गत शार्कच्या संवर्धन व व्यवस्थापनेविषयांचे तांत्रिक मार्गदर्शन, शार्क योजनेचा विकास आणि अंमलबजावणी या दोन्ही विषयीचे सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन पुरवणे.

**निम्नलिखित मुद्दयांवर मार्गदर्शन दिले जाईल**

- देखरेख
- माहिती संकलन आणि विश्लेषण
- संशोधन
- मानवी क्षमतेची इमारत
- व्यवस्थापनेच्या उपायांची अंमलबजावणी

**शार्क योजनेमध्ये खालील गोष्टी अंतर्भूत असाव्यात**

**ए(A). प्रचालित स्थितीचे वर्णनः**

- शार्क साठा, लोकसंख्या
- संबंधित मासेमारी आणि
- व्यवस्थापनेची चौकट आणि त्याची अंमलबजावणी

**बी (B) शार्क योजनेची उद्दिष्टे.**

**सी (C) उद्दिष्ट साध्य करण्याची निती. निम्नलिखित लक्षणीय उदाहरणे समाविष्ट केली जाऊ शकतात**

- मासेमारी जहाजांचा शार्क साठयाशी येणा-या संबंधावर नियंत्रण आणणे
- कुठल्याही प्रकारच्या शार्क मध्ये जेथे पकडीची शाश्वता नाही तेथे मात्स्यिकी प्रयास
- शार्कच्या पकडीचा वापर सुधारणे
- शार्क मासेमारी विषयांची माहिती संकलन आणि देखरेख सुधारणे
- ज्या शार्क प्रजातीविषयी अत्यल्प माहिती आहे त्याविषयींच्या संशोधनासाठी सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- शार्कचा वापर आणि व्यापार विषयीची माहिती मिळवणे.

**परिशिष्ट- ब**

## शार्क मूल्यांकनाच्या अहवालाविषयी सूचवलेले मुद्दे

**शार्क मूल्यांकन अहवालामध्ये इतर बाबीं बरोबर खालील गोष्टींचा समावेश असावा.**

- यासाठी मागील आणि सध्या, काल
- निर्देशित आणि गैरनिर्देशित मात्स्यिकी, प्रयास, सर्व प्रकारची मात्स्यिकी
    - उत्पादनः- शारीरिक आणि आर्थिक
    - साठयाची स्थिती
- व्यवस्थापनाचे वर्तमान उपाय
- मत्स्य साठयाच्या प्रवेशाजवळ नियंत्रण
    - तांत्रिक उपाय (अप्रधान पकड कमी करण्यासाठी उपाय, अभयारण्यांचे अस्तित्व आणि हंगामी बंद यांचा समावेश)
    - इतर
    - देखरेख, नियंत्रण आणि निगराणी
- व्यवस्थापनेच्या उपायांची परिणामकारकता
- व्यवस्थापनेच्या उपायांतील शक्य असलेले बदल

## मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना

### परिचय

1. जबाबदारीपूर्ण मासेमारीची आचारसंहिता आणि शाश्वत मासेमारी यांच्या एकूण उद्देशांसंदर्भात जागतिक मासेमारीतील वाढत्या मासेमारीच्या क्षमतेमुळे चिंता वाढत चालली आहे. वाढती मासेमारी क्षमता ही एक समस्या आहे जी दुस-यांमध्ये म्हणजेच अतिमासेमारी, सागरी मत्स्य संसाधनातील पतन, संभाव्य उत्पादन आणि महत्वपूर्ण आर्थिक कचरा कमी करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान देते.

2. आचारसंहिता असे प्रदान करते की अति मासेमारी क्षमता थांबवण्यासाठी किंवा नष्ट करण्यासाठी उपाय योजिले पाहिजेत व हे सुनिश्चित केले पाहिजे की मासेमारी प्रयासाची पातळी ही मत्स्य संसाधनांचा शाश्वत वापरासोबत वाजवी आहे.

3. 1997 मध्ये अंतिम सत्रामध्ये, मत्स्य व्यवसाय समितीने कोफी (COFI) ने मासेमारी क्षमतेविषयीच्या समस्या संबोधित करण्यासाठी याचना केली. एफ ए ओ (FAO) ने मत्स्य क्षमतेच्या व्यवस्थापनेसाठी एका तांत्रिक कार्यसमूहाचे 15-18 एप्रिल 1998 मध्ये ला जोला, USA मध्ये आयोजन केले. त्या सोबतच एफ ए ओ (FAO) ची सल्ला बैठक 26-30 ऑक्टोबर 1998 मध्ये रोम मध्ये झाली ज्याची तयारी बैठक 22-24 जुलै 1998 मध्ये झाली.

### भाग-I कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेचे स्वरुप आणि प्राप्ती

4. कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना ऐच्छिक आहे कलम 2 (डी) च्या विचाराधीन हे जबाबदार मत्स्य व्यवसाय आचारसंहितेच्या चौकटीत स्पष्ट करण्यात आले आहे. कलम 3 च्या तरतुदीची व्याख्या कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेचा तसेच इतर आंतरराष्ट्रीय उपकरणांशी लागू होते.

5. हा दस्तावेज, आचारसंहिता लागू करण्यासाठी सर्व राज्यांना बांधिल आहे. राज्य आणि प्रादेशिक मत्स्य व्यवसाय संस्थांनी हा दस्तावेज नियमितपणे कारवाईची आंतरराष्ट्रीय योजना आणि त्यांचा इतर आंतरराष्ट्रीय उपकरणांशी असलेला संबंध यांना लागू केला पाहिजे.

6. कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेमध्ये मत्स्य संवर्धन आणि शाश्वत व्यवस्थापन या घटकांचा समावेश आहे.

**भाग-।। उद्देश आणि तत्वे**

7. राज्य आणि प्रादेशिक मत्स्य व्यवसाय संस्थांसाठी कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेचा तत्काल उद्देश्य हा जागतिक स्तरावर मासेमारी क्षमतेचे कार्यक्षम न्यायसंगत आणि पारदर्शक व्यवस्थापन मुख्यत्वेकरून 2003 पर्यत परंतु 2005 च्या आत करणे हा आहे. राज्य आणि प्रादेशिक मासेमारी संस्थांना सध्या अतिक्षमतेच्या समस्यांनी गाठले आहे. ज्यामध्ये दीर्घकालीन शाश्वत टिकाव करण्यासाठी त्यांनी वर्तमान स्थितीमध्ये परिणाम झालेल्या मत्स्य व्यवसायाच्या मासेमारीची क्षमता मर्यादित केली पाहिजे आणि हळुहळु कमी केली पाहिजे. जेथे दीर्घकालीन शाश्वत परिणाम साध्य करायचा आहे तेथे राज्य आणि प्रादेशिक मत्स्य व्यवसाय संस्थांनी दीर्घकालीन शाश्वतीचे उद्दिष्ट मिळवण्यासाठी आणि क्षमतेतील वाढ टाळण्यासाठी खबरदारी घेतली पाहिजे.

8. वरील उद्दिष्टे चार प्रमुख धोरणांशी संबंधित क्रिया मालिका माध्यमातून साध्य करता येऊ शकेल.

i) मत्स्य क्षमतेचे राष्ट्रीय, प्रादेशिक आणि जागतिक मूल्यांकन आणि मत्स्य क्षमतेची देखरेख सुधारण्यासाठी आचार

ii) प्रभावीपणे मत्स्य क्षमतेचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि किना-याजवळील मासेमारीसाठी आवश्यक असलेले तत्काल उपाय त्वरील अमलात आणण्यासाठी राष्ट्रीय योजना तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

iii) प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर मासेमारी क्षमतेचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी प्रादेशिक मत्स्य व्यवसाय संस्था आणि इतर संबंधित यंत्रणेची बळकटी करणे.

iv) प्रमुख ट्रान्स बाऊंडरी, स्ट्रॅडलिंग, अत्यंत स्थलांतरीत आणि महासागरातील मासेमारीसाठी आवश्यक असलेल्या तत्काल उपायांची त्वरीत कारवाई करणे.

ही धोरणे पूरक यंत्रणांच्या अंमलबजावणीतून कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेची अंमलबजावणी, जागरुकता निर्माण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक, तांत्रिक सहकार्य आणि समन्वय यांच्या प्रोत्साहनासाठी राबविण्यात येतील.

9. मासेमारी क्षमतेचे व्यवस्थापन जबाबदार मत्स्य व्यवसाय आचारसंहितेवर आधारीत असले पाहिजे आणि खालील मुख्य तत्वे आणि पद्धती विचाराधीन असली पाहिजे.

i) **सहभागः-** कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेची अंमलबजावणी राज्यांकडून प्रत्यक्षपणे किंवा इतर राज्यांच्या सहकार्यातून किंवा एफ ए ओ (FAO) च्या माध्यमातून इतर योग्य आंतर सरकारी संस्थांच्या माध्यमातून ज्यामध्ये प्रादेशिक मत्स्य व्यवसाय

संस्थांचा समावेश होतो त्याद्वारे कार्यान्वित केली पाहिजे. या कारवाईला परिणाम देण्यासाठी आणि ज्या कृतीची अंमल-बजावणी करायची आहे त्याबद्दलची एफ ए ओ (FAO) ला माहिती देण्यासाठी राज्य आणि प्रादेशिक मत्स्य व्यवसाय संस्थांना प्रोत्साहित केले पाहिजे.

ii) **टप्प्या टप्प्याने अंमलबजावणी**:- मासेमारी क्षमतेचे व्यवस्थापन राष्ट्रीय आणि प्रादेशिक योजनेच्या आधारावर खालील तीन टप्प्यांमध्ये साध्य केले पाहिजे. मूल्यांकन आणि निदान (प्राथमिक विश्लेषण) 2000 च्या अखेर पर्यंत पूर्ण करणे ) व्यवस्थापनेचे उपाय अमलात आणणे (प्राथमिक पावले 2002 च्या अखेरपर्यंत अंमलात आणणे आणि अशा मूल्यांकनाचे नियतकालीक समायोजन आणि उपायांचे निदान योग्य प्रकारे करणे. राज्यांनी आणि प्रादेशिक मत्स्य व्यवसाय संस्थांनी ही पावले आणि कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनामध्ये सूचित केलेले पूरक उपाय यांची अंमल-बजावणी 2005 पर्यंत केली पाहिजे.

iii) **समग्र दृष्टिकोनः** मत्स्य क्षमतेच्या व्यवस्थापनेचा विचार करताना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय या दोन्ही पाण्यातील क्षमतेवर जे घटक परिणाम करतात त्या सर्व घटकांचा विचार केला पाहिजे.

iv) **संवर्धनः** माशांच्या साठयाचे संवर्धन आणि शाश्वत वापर, सागरी पर्यावरणाच्या संरक्षणांसाठी योजलेले प्रतिबंधात्मक उपाय, अप्रधान कचरा कमी करणे, विशिष्ट आणि पर्यावरण पूरक मासेमारी पद्धती, सागरी पर्यावरणातील जैव विविधतेचे संरक्षण करणे आणि चिंतेत असलेल्या विशिष्ट प्रजातीच्या पर्यावरणाचे संरक्षण करणे, या सर्व बाबींचा विचार मात्स्यिकी क्षमतेच्या व्यवस्थापनेची रचना करताना करण्यात यावा.

v) **प्राधान्यः** ज्या मासेमारीमध्ये मूलतः असमान अतिमासेमारी होत आहे अशा पद्धतीना मासेमारी क्षमतेचे व्यवस्थापन करताना प्राधान्य देणे गरजेचे आहे.

vi) **नवीन तंत्रज्ञानः** मासेमारीच्या सर्व क्षेत्रातील पर्यावरणपूरक आणि विकसित तंत्रज्ञान या सर्व बाबी विचाराधीन करुन मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेची रचना करावी.

vii) **गतिशीलताः** मासेमारी क्षमतेचे व्यवस्थापन करताना मासेमारी क्षमतेच्या प्रभावी वापराला प्रोत्साहन आणि जेव्हा ते शाश्वतीच्या दृष्टीने नकारात्मक परिणाम दर्शविते तेव्हा गतीशीलता कमी केली पाहिजे आणि इतर मासेमारी व्यवसायातील सामाजिक आर्थिक कामगिरीवर लक्ष दिले पाहिजे.

viii) **पारदर्शकताः** आचार संहितेच्या 6.13 च्या कलमानुसार कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेची अंमलबजावणी पारदर्शक पद्धतीने झाली पाहिजे.

10. विकसित देशांची क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने, त्यांची स्वतःची मासेमारी पद्धत सुधारण्यासाठी तसेच महासागरातील मासेमारीमध्ये सहभागी होण्यासाठी अशा मासेमारी पद्धतीच्या प्रवेशाचा समावेश त्याचे कायदेशीर अधिकार आणि आंतरराष्ट्रीय कायदयांतर्गत बंधने यानुसार आचार संहितेच्या विशेषतः कलम 5 च्या आधारावर कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेची अंमलबजावणी केली पाहिजे.

**भाग 3 – तत्काल कारवाई**

सत्र- I मासेमारी क्षमतेचे मूल्यांकन आणि देखरेख मत्स्यन क्षमतेचे मापन

11. राज्यांनी मासेमारी क्षमतेचे मापन आणि देखरेखींशी संबंधित असलेल्या मूलभूत समस्या चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर समन्वित प्रयत्न आणि संशोधनाचे समर्थन केले पाहिजे.

12. मासेमारी क्षमतेचे मापन आणि व्याख्या तसेच माहिती संग्रहण आणि विश्लेषण हेतु तांत्रिक मार्गदर्शनावर 1998 मध्ये यथासंभव होणा-या एफ ए ओ (FAO) च्या तांत्रिकी सल्ल्याद्वारे राज्यांनी संस्थांचे समर्थन केले पाहिजे या सल्लामसलतीचा परिणाम परत्वे राष्ट्रीय, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर मासेमारी क्षमतेच्या प्राथमिक मूल्यांकनासाठी विशिष्ट मार्गदर्शन पूरवते, याची नोंद केली पाहिजे.

**मासेमारी आणि बोटींसाठी त्वरीत आवश्यक असलेल्या उपायांचे निदान आणि ओळख**

13. राज्यांनी प्राथमिक मासेमारीच्या सर्व बोटींच्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवरील मासेमारी क्षमतेचे प्राथमिक मूल्यांकन 2000 च्या अखेर पर्यत अद्यावीत केले पाहिजे.

14. राज्यांनी, राष्ट्रीय मात्स्यिकी तसेच बोटी ज्यांना त्वरीत उपायांची आवश्यकता आहे त्यांची पद्धतशीरपणे ओळख 2001 च्या अखेरपर्यत केली पाहिजे आणि वेळोवेळी या विश्लेषणाचें सुधारणा केली पाहिजे.

15. राज्यांनी ट्रान्सबाऊंडरी, स्ट्रॅंडलिंग, अत्यंत स्थलांतरीत आणि महासागरातील मासेमारी तसेच प्रादेशिक आणि जागतिक मासेमारी आणि बोटींना लागणा-या त्वरीत उपायांची ओळख करण्यासाठी मासेमारी क्षमतेचे समान मूल्यांकन करणा-या संस्थांसोबत प्रादेशिक पातळीवर (संबंधित मासेमारी संस्थांच्या आत किंवा त्यांच्या सहकार्याने) आणि जागतिक पातळीवर (एफ ए ओ (FAO) च्या सहकार्याने) आपापल्या चौकटीमध्ये सहकार्य केले पाहिजे.

**मासेमारी बोटींच्या नोंदीची स्थापना**

16. राज्यांनी मासेमारी बोटीची नोंद ठेवण्यासाठी योग्य प्रकारे आणि सुसंगत मानकांच्या विकासासाठी एफ ए ओ (FAO) ला समर्थन केले पाहिजे.

17. राज्यांनी मासेमारी बोटींची योग्य आणि सुसंगत राष्ट्रीय नोंद राखण्यासाठी विकास केला पाहिजे तसेच ही माहिती मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी निर्देशित केल्या पाहिजेत

18. करार अमलात आणण्याची वाट पाहताना, महासागरातील मासेमारी बोटीचे आंतरराष्ट्रीय संवर्धन आणि व्यवस्थापनांच्या उपायांचे पालन (अनुपालन करार) करण्यासाठी समर्थन करताना राज्यांनी एफ ए ओ (FAO) च्या माध्यमातून 2000 च्या अखेरपर्यंत महासागरातील मासेमारी बोटींची, अनुपालन करारामध्ये निर्देशित केल्यानुसार आंतरराष्ट्रीय नोंद ठेवणे.

19. राज्यांनी मासेमारी क्षमतेवर परिणाम करणा-या विविध संसाधन व्यवस्थापनेच्या दृष्टिकोनातून, मासेमारी क्षमतेचे व्यवस्थापन करताना, राष्ट्रीय योजनेचा विकास, अंमलबजावणी आणि देखरेख केली पाहिजे.

20. राज्यांनी मासेमारी क्षमतेचे पद्धतशीरपणे आणि अचूकपणे देखरेख करण्यासाठी आणि उपलब्ध मासेमारी संसाधने तसेच व्यवस्थापनांच्या उद्देशांसोबत कोणत्याही प्रकारचा असमतोल पडताळून पाहण्यासाठी साधनांचा विकास केला पाहिजे.

21. राज्यांनी मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या राष्ट्रीय योजनेचा 2002 च्या अखेरपर्यंत विकास केला पाहिजे व आत्मसात केली पाहिजे तसेच त्याचे सार्वजनिकीकरण केले पाहिजे आणि आवश्यकता असेल तर शाश्वतीच्या दृष्टीकोनातून मासेमारी क्षमतेचा इतर उपलब्ध संसाधनांशी समतोल राखण्यासाठी, मासेमारी क्षमता कमी केली पाहिजे. आणि हे मासेमारी साठयाच्या मूल्यांकन आणि ज्या बाबींना त्वरीत उपायांची गरज आहे त्याकडे लक्ष देण्याच्या तत्वावर आधारीत असले पाहिजे तसेच ज्या साठयाची लक्षणीयरित्या अतिमासेमारी केली जाते त्या मासेमारी साठयांच्या व्यवस्थापनेसाठी त्वरीत पावले उचलली पाहिजेत.

22. राज्यांनी राष्ट्रीय योजनेचा विकास करताना आर्थिक सामाजिक गरजा, तसेच मासेमारी समुदायाला रोजगाराचे पर्यायी स्त्रोत जे मासेमारी क्षमता कमी करण्याचे ओझे सहन करु शकतात अशा गोष्टी अंतर्भूत करुन त्या विचाराधीन असणे आवश्यक आहे.

23. जेव्हा असे आढळून आले की मत्स्य क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या राष्ट्रीय योजनेची आवश्यकता नाही तेव्हा राज्यांनी सुनिश्चित केले पाहिजे की मासेमारी व्यवस्थापनेमध्ये मासेमारी क्षमतेची बाब ही सातत्याने उद्देशून आहे.

24. राज्यांनी दर चार वर्षानी परिणामकारकता वाढवण्यासाठी तसेच प्रभावी धोरण ओळखण्याच्या हेतुने त्यांच्या राष्ट्रीय योजनेची पडताळणी केली पाहिजे.

25. मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या राष्ट्रीय योजनेचा विकास करताना राज्यांनी सर्व शक्य परिणामांचा विचार करणे गरजेचे आहे. अतिमासेमारीमुळे आवश्यक असलेल्या शाश्वत व्यवस्थापनेमध्ये अनुदान, विविध घटक तसेच अतिमासेमारी आणि अशाश्वत मासेमारीवर सकारात्मक किवा तटस्थ परिणाम करणा-या अनुदानाच्या योगदानाचा समावेश होतो .

26. राज्यांनी, पांरपारिक मासेमारीला योग्य न्याय देऊन सर्व घटक, ज्यामध्ये अनुदान आणि आर्थिक लाभांश आणि इतर घटक जे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अतिमासेमारी क्षमतेला कारणीभूत आहेत आणि ज्यामुळे सागरी जैव संसाधनांची शाश्वता कमी होते त्या सर्व घटकांना कमी करुन उत्तरोत्तर काढून टाकले पाहिजे.

**प्रादेशिक विचारः**

27. राज्यांनी प्रादेशिक मत्स्य व्यवसाय संस्था किंवा व्यवस्था आणि इतर माध्यमाच्या सहकार्यातून मासेमारी क्षमतेच्या प्रभावी व्यवस्थापनेची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने योग्य तेथे सहकार्य केले पाहिजे.

28. राज्यांनी एफ ए ओ (FAO) आणि संशोधन, प्रशिक्षण आणि माहिती व शैक्षणिक साहित्याच्या उत्पादनाच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतून मासेमारी क्षमतेच्या प्रभावी व्यवस्थापनेला प्रोत्साहन देण्यासाठी सहकार्य केले पाहिजे.

**कलम-3 आंतरराष्ट्रीय विचार**

29. राज्यांनी मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेशी संबंधित आणि विशेषतः अनुपालन करार आणि 10 डिसेंबर 1982 च्या संयुक्त राष्ट्र संघाच्या सागरी कायदयाच्या प्रथेनुसार तरतुदीच्या अंमलबजाणीच्या करारानुसार स्ट्रँडलिंग मत्स्य साठे आणि अत्यंत स्थलांतरीत मत्स्य साठयांच्या संवर्धन आणि व्यवस्थापनेशी संबंधित आंतरराष्ट्रीय करारामध्ये भाग घेण्याचा विचार केला पाहिजे.

30. राज्यांनी, सर्व प्रादेशिक संस्थांमध्ये त्यांच्या कार्यपद्धतीनुसार आपापसात समन्वय आणि माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी समर्थन केले पाहिज.

31. राज्यांनी त्यांच्या महासागरातील मासेमारीमध्ये समावेश असलेल्या जहाजांच्या मत्स्यन व्यवस्थापनेसाठी पावले उचचली पाहिजेत आणि इतर राज्यांना त्यांच्या महासागरातील साठयाच्या अतिमासेमारीला लागू झालेली मासेमारी क्षमता कमी करण्यासाठी योग्य प्रकारे सहकार्य केले पाहिजे.

32. राज्यांनी शक्य तेथे प्रादेशिक मात्स्यिकी संस्था आणि एफ ए ओ (FAO) च्या सहकार्यातून महासागरातील तसेच किना-यावरील, त्यांच्या जहाजांवरुन केलेल्या, पकडीच्या माहितीच्या संग्रहणामध्ये सुधारणा केली पाहिजे.

33. राज्यांनी अशा राज्यांच्या समस्यांचे निवारण करण्याची गरज ओळखली पाहिजे जे राज्य मासेमारी जहाजासंबंधी झेंडा राज्यांच्या रुपात आंतरराष्ट्रीय कायदयांतर्गत त्यांची जबाबदारी पूर्ण करत नाहीत आणि जे राज्य त्यांच्या अधिकार क्षेत्रात प्रभावीपणे प्रयोग करत नाहीत आणि ज्यांची जहाजे आंतरराष्ट्रीय कायदयांच्या संगत नियमांचे आणि आंतरराष्ट्रीय संरक्षण आणि व्यवस्थापन उपायांचे उल्लंघन करतात किंवा हानी पोहचवतात. राज्यांनी, अशी झेंडा राज्ये मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेसाठी प्रादेशिक प्रयत्नांमध्ये योगदान देतात याची सुनिश्चिती करुन बहुपक्षीय सहकार्याला समर्थन दिले पाहिजे.

34. राज्यांना प्रादेशिक मासेमारी संस्थांचा किंवा व्यवस्थेचा सदस्य बनवण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे किंवा अशा संस्थांनी किंवा व्यवस्थापनेने त्यांच्या जहाजांसाठी स्थापन केलेले संवर्धन आणि व्यवस्थापनेचे उपाय लागू करण्यासाठी सहमत केले पाहिजे.

35. राज्यांनी एफ ए ओ (FAO) च्या मदतीने अनुपालन कराराच्या कलम 6च्या सुसंगतीप्रमाणे प्रादेशिक मात्स्यिकी संस्था आणि व्यवस्थांनी लागू केलेल्या संवर्धन आणि व्यवस्थापन उपायांचे पालन न करणा-या जहाजांच्या मासेमारी पद्धतीच्या माहितीच्या देवाणघेवाणीसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

36. अनुपालन करारामध्ये प्रवेश करण्यासोबतच राज्यांनी कराराच्या कलम-3 च्या तरतुदी लागू करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

37. राज्यांनी सूनिश्चित केले पाहिजे की दुस-या राज्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये त्या राज्यांच्या संमंतीशिवाय आणि औपचारिक अधिकृतते शिवाय क्षमतेचे हस्तांतरण केले जात नाही आहे.

38. राज्यांनी त्यांचे झेंडा राज्य म्हणून कर्तव्याचे पालन करताना,आचार-संहितेच्या जबाबदार मासेमारीच्या अंतर्गत विसंगत मानल्या जाणा-या झेंडा धारण करणा-या जहाजांचे महासागरातील स्थानांतरण टाळले पाहिजे.

**कलम- IV: मूख्य आंतरराष्ट्रीय मासेमारीसाठी आवश्यक असणा-या त्वरीत उपायांसाठी तत्काल क्रिया**

39. राज्यांनी मासेमारीसाठी आवश्यक असणा-या मासेमारीच्या क्षमतेच्या व्यवस्थापनेसाठी आणि प्राधान्याने ट्रान्सबाऊंडरी, स्ट्रँडलिंग, अत्यंत स्थलांतरीत आणि महासागरातील साठे ज्यांची लक्षणीयरित्या अतिमासेमारी होते त्यांवर त्वरीत लक्ष देण्यासाठी तत्काल पावले उचली पाहिजे.

40. राज्यांनी त्यांच्या संबंधित पूरक चौकटी अंतर्गत, वैयक्तिक, व्दिपक्षीय आणि बहुपक्षीय रुपामध्ये, कारवाईच्या आंतरराष्ट्रीय योजनेचा इतर संबंधित तरतुदी विचारात घेऊन, व्यवस्थापन धोरणांच्या भाग म्हणून संसाधनांना लागू केलेल्या जहाजांची क्षमता हळूहळू कमी करण्यासाठी अतिमासेमारी केलेले साठे शाश्वत पातळीवर पुर्नसंचयित करण्यासाठी योग्य प्रकारे कार्य केले पाहिजे.

i) अति मत्स्यन साठयाची पकड करणा-या जहाजाचे आर्थिक महत्व आणि साठयाची स्थिरता तसेच आर्थिक व्यवहार्यतेशी सुसंगत एका पातळीवर या जहाजांना सीमित करण्याची आवश्यकता आहे.

ii) मासेमारीच्या साठयाची स्थिती लक्षात घेता पूर्णपणे शोषित किंवा अतिशोषण झालेल्या मासेमारीच्या अतिक्षमतेचे हस्तांतरण नियंत्रण करण्यासाठी योग्य उपायांचा वापर.

**भाग - IV: अंमलबजावणीला प्रोत्साहन देणारी यंत्रणा**

41. राज्यांनी मासेमारीच्या क्षमतेच्या बदलामुळे येणारा खर्च आणि कायदा यांच्या गरजेतून तसेच माशांच्या क्षमतेच्या व्यवस्थापनेची गरज म्हणून राष्ट्रीय, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर जागरुकता वाढवण्यासाठी माहिती कार्यक्रमांचा विकास करावा.

**वैज्ञानिक आणि तांत्रिक सहकार्यः**

42. राज्यांनी मत्स्यन क्षमतेच्या व्यवस्थापनेशी संबंधित बाबींवर वैज्ञानिक आणि तांत्रिकी माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी समर्थन केले पाहिजे आणि वर्तमान प्रादेशिक आणि जागतिक फोरा चा वापर करुन जागतिक व्यापक उपलब्धतेला प्रोत्साहन दिले पाहिजे.

43. राज्यांनी मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेशी संबंधित बाबींवर विकसित देशांना प्रशिक्षण आणि संस्थात्मक बळ देण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे आणि आर्थिक, तांत्रिक आणि इतर मदत प्रदान करण्यासाठी विचार केला पाहिजे.

**नोंदणी**

44. राज्यांनी, आचार संहितेवर एफ ए ओ (FAO) ला आपल्या व्दैवार्षिक योजनेच्या अहवालाचा भाग म्हणून मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापन हेतु आपल्या योजनांच्या मूल्यांकन, विकास आणि अंमलबजावणीच्या प्रगतीचा अहवाल सादर केला पाहिजे.

**एफ ए ओ (FAO) ची भूमिकाः-**

45. एफ ए ओ (FAO) आपल्या परिषदेने निर्देशित केल्याप्रमाणे, शक्य तितक्या प्रमाणात अतिक्षमतेमध्ये योगदान देणा-या घटक ओळखण्याच्या उद्देशाने, उदा. इनपूट आणि आऊटपूट वर बंधन, अशाश्वत मासेमारी व्यवस्थापनेच्या पद्धती आणि अतिक्षमतेमध्ये योगदान देणा-या निधीतून पुढील विश्लेषणाला आधारभूत ठेवून सर्व संबंधित माहिती गोळा करील.

46. एफ ए ओ (FAO), आपल्या परिषदेने निर्देशित केल्यानुसार आपल्या नियमित कार्यक्रम उपक्रमाचा भाग म्हणून राज्यांना त्यांच्या मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या राष्ट्रीय योजनेच्या अंमलबजावणीला सहकार्य करील.

47. एफ ए ओ (FAO), आपल्या परिषदने निर्देशित केल्यानुसार मासेमारी क्षमतेच्या व्यवस्थापनेच्या राष्ट्रीय योजनेच्या विकास आणि अंमलबजाणीसाठी, विशिष्ट देश तांत्रिक सहाय्य प्रकल्प तसेच नियमित उपक्रमाच्या निधीतून आणि या कारणासाठी संघटनेसाठी उपलब्ध केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय निधीचा वापर करुन शक्य तितक्या प्रमाणात सहकार्य करील .

48. एफ ए ओ (FAO), कोफी (COFI) च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय योजनेच्या अंमलबजावणीच्या विकासाच्या स्थितीचा व्दिवार्षिक अहवाल सादर करील.

आंतरराष्ट्रीय कारवाईची योजना हे एक ऐच्छिक साधन आहे. जे राज्यांना लागू होते. आंतरराष्ट्रीय कारवाईच्या योजनेच्या या मजकूरामध्ये उपक्रमांचे संच दिले आहेत. जे राज्यांनी अमलात आणणे अपेक्षित आहे. समस्या अस्तित्वात आहेत की नाही यांचे मूल्यांकन, राष्ट्रिय पुनरावलोकन आणि अहवाल आवश्यकतेच्या कृती यांचा समावेश आहे. प्रत्येक कारवाईच्या योजनेच्या उपायांच्या अंमलबजावणीसाठी तिथी सुद्धा निर्देशित आहे.

*Translated and Printed by the Bay of Bengal Programme*
*Inter-Governmental Organisation*
*September 2015*